10

# वारकरी भजनातील सांगीतिक तत्व, विशेषता

**प्रा.एस.के.कोकाटे**
संगीत विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय,
परभणी - ४३१ ४०१

वीणावादनतत्वज्ञः श्रृतिजातिविशारदः।
तालज्ञश्चप्रयासेन मोक्षमार्ग नियच्छती।।

आपल्या भारत देशामध्ये विविध जाती धर्माचे लोक राहतात. आणि या प्रत्येक धर्मामध्ये त्या त्या धर्माचा प्रचार, प्रसार करण्यासाठी आणि त्या त्या धर्मातील नितीमुल्यांची शिकवण देऊन समाज प्रबोधन करण्यासाठी अनेक सांप्रदायाची निर्मिती झालेली दिसून येते. त्यामध्ये प्रामुख्याने वारकरी संप्रदाय, नाथ संप्रदाय, महानुभाव निर्मिती, शिख संप्रदाय, इत्यादी प्रमुख संप्रदाय दिसून येतात. हा प्रत्येक संप्रदाय आध्यात्माशी जोडला गेलेला असून प्रत्येक संप्रदायाने मोक्षप्राप्ती हे साध्य मानून संगीत हे मोक्षप्राप्तीचे एक प्रमुख साधन मानलेले आहे. प्रत्येक संप्रदायातील महान विभूती, संत महात्म्यांनी भक्तीसंगीताद्वारे ईश्वरप्राप्ती करुन घेतल्याचे अनेक दाखले विविध धर्मग्रंथातून दिसून येतात. म्हणून वीनावादनाचे तत्व जाणणारा श्रृतीजातीमध्ये विशारद (पारंगत) आणि तालाचे ज्ञान असणारा व्यक्ती विनाप्रयास मोक्ष प्राप्ती करुन घेतो.

**वारकरी संप्रदायाची परंपरा :**

वारकरी संप्रदायाची निर्मिती आणि विकास प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये झालेला दिसून येतो. संत नामदेवाच्या रुपाने या संप्रदायाचा प्रचार, प्रसार पंजाब राज्यामध्येही झालेला दिसून येतो.

**ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस।**

या संप्रदायाचा मुख्य पाया ज्ञानदेवांनी रचला. संत नामदेवांनी या धर्माचा प्रचार, प्रसार केला आणि संत तुकोबारायांनी वारकरी संप्रदाय पुर्णत्वास नेला. प्रामुख्याने १३ वे शतक ते १६ वे शतकापर्यंतचा काळ हा भक्तीसंप्रदायाच्या चळवळीचा काळ मानला जातो.या संप्रदायामध्ये संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत सेना महाराज, संत गोरा कुभांर, संत सावता माळी, संत चोखामेळा, संत जनाबाई, इत्यादी अनेक संत विभुतींनी हा संप्रदाय वाढवला.

**वारकरी भजन आणि त्याची संहिता**

संप्रदायातील अनेक साधुसंतांनी हजारो भक्तीपदची रचना करुन ते गेय रुपात सादर करुन वारकरी भजन आणि वारकरी किर्तनाच्या माध्यमातून लोकांसमोर नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसून येतो. आजही २१ व्या शतकातील विज्ञानयुगामध्ये ही वारकरी संप्रदायातील भक्तीपदे अत्यंत श्रध्देने आणि काटेकोर नियमांचे पालन करुन गायीली जातात. पंढरपुर हे संप्रदायाचे माहेर घर तर पंढरीचा विठोबा हा संप्रदायाचे दैवत मानला जातो.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिलेला हरिपाठा आजही संप्रदायातील अनुयायी नित्यनियमाने रोज गातात. हरिजागर करत असतांना सुरूवातीला जय जय राम क्‌ष्ण हरि या नामाचे गायन केले जाते नंतर रूप पाहता लोचनी हा रूपाचा अभंग नंतर सुंदर ते ध्यान हा नामावलीतील अभंग घेउुन शेवटी विठ्ठलाचा गजर केला जातो. या सर्व पदांना पंचपदि म्हणतात आणि या पंचपदिनेच हरिजागराची सुरूवात होते. नंतर विविध संतरचित पदे विविध रागांमध्ये गायीली जातात. त्या पदांना अभंग असे म्हणतात. अंभंगानंतर संतरचित गौळणी गाउुन शेवटी भैरवी घेऊन तुकारामाच्या गजराने हरिजागरणाची सांगता केली जाते.

वारकरी किर्तन ही एक वारकरी संप्रदायाला लाभलेली ख-या अर्थाने सांगीतिक मेजवाणी आहे. हरिकिर्तनामध्ये सुरूवातीला रामकृष्ण हरि नंतर रूपाचा अंभंग घेऊन, कोणताही एक संत रचित अभंग घेऊन त्याचे निरूपण केले जाते. हे निरूपण करत असतांना अभंगातील एक एक अंतरा घेऊन सप्रमाण देऊन त्याचे निरूपण केले जाते. संगीताची साथ संग करण्यासाठी विना, मृदंग आणि अनेक टाळकरी गायक असतात. निरुपण करण्यासाठी जो अभंग निवडलेला आहे त्या अभंगाच्या वेगवेगळया अंत-यावर वेगवेगळे गायक गायन करत असतात. त्याला संप्रदायामध्ये चाल असे म्हणतात. शेवटी चाल ही प्रामुख्याने तोडी किंवा भैरवी रागात गायली जाते.

**वारकरी भजन परंपरा आणि त्यातील सांगीतिक तत्व, विशेषतः**

भजन-किर्तन हा जोडशब्द का रुढ झाला ते सांगता येत नाही. दोहोंचा संबंध भक्तीमार्गाशी असल्याने या दोन्हीत असलेला भेद ही आपण फारसा विचारात घेत नाहीत. किर्तनाची जोड नसलेला भजन हा शब्द आपण योजतो. तेव्हा टाळ मृदंगाच्या साथीसह पद व अभंग यांचे गायन असा त्याचा अर्थ असतो. वस्तुः ‘भजन’ हा संगीताच्या क्षेत्रात विशिष्ट अर्थाने वापरण्यात येणारा शब्द आहे. ‘राग आळविणे’ या अर्थाने भजन ही संज्ञा योजण्यात येते. ‘‘संगीत-रत्नकारात’’ भजनाचे स्वरुप पुढील प्रमाणे सांगण्यात आलेले आहे. ‘रागस्य अतिशयाधानं प्रयत्नात् भजनं मतम्’ सद ३.१.१२८ ‘रागात प्रयत्नपुर्वक अतिशय रंजकत्व आणने यास भजन म्हणावे.’ असा या लक्षणाचा अर्थ होतो. भजनातून होणारी विविध रागांची आळवणी ही आगंतुक नसून तिला शास्त्राधार आहे. हे भजनाची मुळ व्याख्या सांगते. परंतू भक्तीचे महात्म्य प्रभावी असल्यामुळे भजनाच्या मुळाशी संगीत परिभाषा आहे हे भान पुसट होत गेले.

भजन हा एकच शब्द शास्त्रोक्त संगीत आणि भक्तीपर पदांचे गायन यांचे दृढ संबंध प्रस्थापित करण्यास पुरेसा ठरतो. भजनात जे जे गायले जाते ते अनिवार्यपणे शास्त्रीय संगीतच असते असा निष्कर्ष भजन या पदाच्या मुळ अर्थाच्या विश्लेषणातून निघतो. व मुळ भागवताच्या दशम स्कंधात ‘जाती-गायनाचा’ उल्लेख केलेला आहे. हे

जातीगायन म्हणजे आधूनिक काळातील रागदारीचेच गायन ‘रागविस्तार’ हा मुळातच भजन या शब्दाचा अभिप्रेत सांगीतिक अर्थ आहे.

वारा जाय भलत्या ठाया। तैसी माझी राग छाया।

गाता येईल तेणेची गावे। येरी हरि हरि म्हणावे।।

या संत नामदेवांच्या अभंगाचा संदर्भ घेऊन त्याकाळीही अभंग किंवा पद रचना ही रागदारी संगीताद्वारे गायीली जात असे हे लक्षात येते.

अभिजात संगीताच्या विकासाबरोबरच वारकरी भजनामध्ये अभिजात संगीताचा किंवा पद रचना ही रागदारी संगीताद्वारे गायीली जात असे हे लक्षात येते.

अभिजात संगीताच्या विकासाबरोबरच वारकरी भजनामध्ये अभिजात संगीताचा किंवा रागदारी संगीताचा वापर अतिशय प्रगल्भ स्वरुपात होत असतांना दिसून येत आहे. अभिजात संगीताचे थोडे-अधिक ज्ञान असणाऱ्या गायकापासून ते अभिजात संगीतातील सर्वश्रेष्ठ भारतरत्न पुरस्कार प्राप्त ‘पंडीत भिमसेन जोशी’ पर्यंत सर्वच गायक-गायीकांनी वारकरी संप्रदायातील भजने किंवा भक्तीपदे ही अभिजात संगीताच्या द्वारे अतिशय प्रगल्भतेने आणि तेवढयाच श्रध्देने गायलेली दिसून येतात.

**पंचपदी :**

वारकरी भजनाच्या संहीतेप्रमाणे हरीजागर करीत असतांना सुरुवातीला ‘जय जय राम कृष्ण हरि’ या नामजपाचे गायन मध्यलयी मध्ये जत, त्रिताल, रुपक, झपताल, अधातीनताल अशा विविध तालांमध्ये केले जाते. भुप, भिमपलास, बिहाग, मारुबिहाग, मधुवंती, यमन अशा प्रचिलित रांगामध्ये पुर्ण रागदारी गायिकेच्या अंगाने हे गायन केले जाते. हे गायन करत असतांना ख्याल गायीकीप्रमाणे एक-एक स्वरांची क्रमाक्रमाने बढत घेऊन राम विस्तार केला जातो. यामध्ये आलाप, बोलआलाप, मिंड, खटका, बेहलावा, मुर्च्छना, सर्व गान अलंकाराचा वापर करुन संपूर्ण राम फुलवला जातो. आलापी प्रमाणे तानांच्या विविध प्रकारांचा वापर करुन रागविस्तार केला जातो. निष्णात गायक विविध लयकारी, चक्रधार, तिहाई, नोटेशन, यांच्या सहाय्याने गायनामध्ये विविधता आणि रंजकत्व आणण्याचा प्रयत्न करतात.

यानंतर रुपावळीचा अभंग ‘रुप पाहता लोचनी’ हा अभंग विविध ताल आणि रागामध्ये गायीला जातो. याची लय मध्य किंवा दृत असते. यानंतर नामावलीतील अभंग घेऊन शेवटी विठ्ठलाच्या नामाचा गजर केला जातो. हा गजर प्रामुख्याने धुमाळी किंवा भजनी ठेका या तालामध्ये जलद लयीत गायीला जातो. वरील सर्व गान प्रकाराला वारकरी संप्रदायात पंचपदी असे म्हंटल जाते.

**अभंगातील सांगीतिक तत्व, विशेषत:**

पंचपदी गायनानंतर संतांच्या गाथ्यातील संतरचित अभंग विविध रागामध्ये गायीले जातात. ही पदे प्रामुख्याने भजनी ठेक्यामध्ये गायीली जातात. ही भजने प्रामुख्याने मध्य आणि दृत लयीमध्ये गायीली जातात. एका भजनामध्ये किंवा

त्यापेक्षा जास्त अंतरे किंवा कडवी असू शकतात. त्यातील प्रत्येक अंतऱ्यानंतर ध्रुवपद गायीले जाते. अंतरा गाऊन ध्रुवपदावर विविध लग्गी-लडींचा वापर करुन गायनामध्ये रंजकता, सौंदर्य वाढवण्याचा प्रयत्न करतो आणि ध्रुवपद गायन संपताच लग्गी-लडीला तोड देऊन पुन्हा मुळ भजनी ठेका पकडतो आणि तेथे संबंधित पदाचा दुसरा अंतरा चालु होतो. अशा प्रकारे रागदारी गायीकेच्या धाटणीचे, अतिशय श्रध्देने भजन किंवा भक्तीपदांचे गायन केले जाते

**पारंपारिक गौळण :**

अभंग गायनानंतर संतरचित गौळणी गाण्याचा प्रघात वारकरी भजनांमध्ये आढळून येतो. गौळण ही साधारणतः लोकगिताच्या धाटणीची असते. गौळणीमध्ये गायनाबरोबरच नृत्य आणि नाटयअंगही दिसून येते. गौळणी मध्ये प्रामुख्याने कृष्ण-राधा, गोप-गोपी आणि त्यांच्या क्रिडांचे, रासलिलांचे वर्णन असते. सांगीतिकदृष्टया गौळण हा प्रकार प्रामुख्याने लयप्रधानतेकडे झुकलेला दिसून येतो. यामध्ये भजनी ठेका, धुमाळी, केरवा, दादरा, इत्यादी प्रमुख तालांचा वापर केलेला दिसून येतो. काही वेळेस नृत्यासहित गौळण गितप्रकाराचे सादरीकरण केले जाते.

गौळण गितगायनानंतर भैरवी रागात भक्तीपद गाऊन हरिजागराची सांगता केली जाते. भैरवी रागाचे पुर्ण दर्शन या पदातून दिसून येते. अशा प्रकारे वारकरी भजनाच्या माध्यमातून रागदारी संगीताची औळख आणि प्रचार, प्रसार समाजातील मोठया घटकांपर्यंत झाल्याचे दिसून येते. त्याच बरोबर विविध संप्रदायातील पद आणि त्यातील अभिजात संगीताचा इतिहास पाहिला तर भारतीय अभिजात संगीताचा उगम हा लोकसंगीतातून झालेला आहे हे सप्रमाण सिध्द होते.

**पारंपारिक भजनी किर्तन :**

संगीताची व्याख्या ‘गायन, वादन आणि नृत्य या तीन कलांच्या समुहाला संगीत असे म्हणतात.’ अशा प्रकारे सांगीतीक ग्रंथामध्ये केलेली दिसून यते. त्या व्याख्येतील तिनही अंगाचा समावेश ज्या प्रकारामध्ये होतो तो म्हणजे वारकरी किर्तन होय. यालाच भजनी किर्तन असे ही म्हटले जाते. यामध्ये गायनाबरोबरच टाळ मृंदगाच्या गजरामध्ये नृत्य सदृश्य हावभाव केले जातात. किर्तनामध्ये निरुपणासाठी ज्या अभंगाची निवड केलेली असते त्यामध्ये काही ठराविक अंतरामध्ये अभंगातील वेगवेगळे अंतरे घेऊन दोन ते तिन वेळेस वेगवेगळे गायक संबंधित अभंगाच्या अंतऱ्यावर रागदारी संगीतामध्ये गायन करतात. आलाप, बोलआलाप, मिंड, खटका, गमक, तानांचे विविध प्रकार, लयकारी, तिहाई अशा रागदारी संगीतातील सर्व अलंकाराचा वापर करुन संबंधित रागाचा विस्तार अतिशय रंजकतेने करतात. हे गायन प्रामुख्याने ‘जत’ तालामध्ये मध्य लयीमध्ये केले जाते. यास वारकरी किर्तनामध्ये ‘ठायीची चाल’ म्हणून संबोधिले जाते. हे गायन प्रामुख्याने भुप, यमन, भिमपलास, पहाडी, शिवरंजनी, दरबारी, जौनपुरी अशा प्रचलित रागांमध्ये केले जाते. यामध्ये मृदंग वादकालाही आपल्या वादनाचे कौशल्य दाखवण्यास वाव मिळतो. यामध्ये वादक आपले वादन अभिजात संगीताच्या अंगाने करत असतो. किर्तनातील शेवटची चाल ही प्रामुख्याने तोडी, भैरवी रागामध्ये गायीली जाते. किर्तनामध्ये आधारस्वर म्हणून तिनही अंगाचा वापर करुन अभिजात संगीताच्या धाटणीचे गायन करुन किर्तनरुपी संगीत मंचावर ब्रम्हानंदाचा आस्वाद घेतला जातो.

एकंदरीत संप्रदायातील वारकरी भजन परंपरेचा इतिहास पाहता वारकरी संप्रदायातील संत, गायकांनी भक्तीपदामध्ये रागदारी संगीताचा वापर करुन अभिजात संगीताचा प्रचार प्रसार करण्यात आणि संगीताचे महत्व पटवुन देण्यात मोलाचा वाटा उचललेला दिसून येतो. पौराणिक ग्रंथामध्ये संगीताचे महत्व किंवा श्रेष्ठत्व सांगताना पुजेपेक्षा स्तोत्राला, स्तोत्रापेक्षा जपाला आणि जपापेक्षा गायनाला श्रेष्ठत्व दिलेले आहे. वारकरी भजनातील अभिजात संगीताचा विचार करता भजन या गितप्रकाराचे वर्गीकरण हे लोकसंगीत किंवा सुगम संगीत या प्रकारात न करता ते उपशास्त्रीय गीतप्रकारात केले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :**

१) निबंध संगीत - लक्ष्मीनारायण गर्ग
२) ओवी ते लावणी - श्री रं.कुलकर्णी
३) संगीतातील घराणी आणि चरित्रे - डॉ.ना.गो.मंगळुरकर
४) संगीत कला विहार